SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - 416 004 महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- 2609000 संलग्नता टी-2 विभाग दूरध्वनी -0231 - 2609091
संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) 0231 - 2609070
Estd.1962
NAAC "A" Grade

संदर्भ क्र. : संलग्नता/टी-2/बीएके/वि.प.विषय क्र. 152 दि. 04/05/2018/ 4575 - दि. 25 MAY 2018

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
यशोदा टेक्निकल कॅम्पस,
फॅकल्टी ऑफ आर्किटेक्चर, सर्व्हे नं. 242/2,
वाढे, सातारा, ता. व जि. सातारा

विषय : आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरण प्रकाराबाबत विद्यापीठाची मान्यता.

संदर्भ : आपला जा. क्र. YSPM/YCA/ADMIN/54/2017-18 dtd. 28/08/2017रोजीचा प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, 2018 पासून खालील संलग्नीकरण प्रकाराचे व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावास विद्यापीठ अधिकार मंडळाने स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या खालील अटी पुर्ततेच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम/शाखा | विद्यापीठाची मान्यता |
|---|---|---|---|
| 1. | नुतनीकरण | F.E to T.E<br>B Architecture ( 40) | जून 2018 पासून<br>एक वर्षासाठी |
| 2. | नैसर्गिक विस्तार | Fourth Year<br>B Architecture (40) | |

**स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.**

1. पूर्णवेळ प्राचार्यांची विद्यापीठ निवड समितीमार्फत निवड करण्यात यावी.
2. ग्रंथपाल पदाची विद्यापीठ निवड समितीमार्फत निवड करण्यात यावी.
3. 1 प्रोफेसर, 2 सहयोगी प्राध्यापक, 6 सहाय्यक प्राध्यापक यांची विद्यापीठ निवड समितीमार्फत निवड करण्यात यावी.
4. प्रभारी प्राचार्यांची विद्यापीठामार्फत मंजुरी घेण्यात यावी.
5. जिमखान्याची विद्यार्थ्यांना त्यांच्यासाठी स्वतंत्र सोय करून देण्यात यावी.
6. विद्यार्थी वसतिगृहाची कॅम्पस मध्ये सोय करून देण्यात यावी.
7. सेवापुस्तकामधील माहिती अद्यावत करण्यात यावी.
8. वैधानिक समित्यांचे कामकाज नियमाप्रमाणे करण्यात यावे.
9. शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी अध्यापनोत्तर स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यात यावा.
10. विद्यार्थ्यांनी नासा या स्पर्धेमध्ये सक्रिय सहभाग घेण्यात यावा.

......2

YSPM'S Yashoda College of Architecture,Satara
Inward No 10
Inward Date:- 14/06/2018
Verified:-

टिप : 1. स्थानिक चौकशी समितीने आपल्या नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयास भेट दिलेल्या स्थानिक चौकशी समितीने विद्यापीठास सादर केलेला अभ्यासक्रमानुसार महाविद्यालयास प्राप्त गुणांकन तसेच छाननी समितीने दिलेला अभिप्राय तसेच आपल्या महाविद्यालयास नियमित प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक (आवश्यकतेनुसार) तसेच, संबंधित अभ्यासक्रमास आवश्यक असणाऱ्या शिक्षक पदे यांच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत नियुक्त्या आणि इतर उपलब्ध आवश्यक भौतिक सुविधा इ. अवलोकनी घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे आपल्या प्रस्तावास संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार यास मान्यता दिली आहे.

2. आपल्या महाविद्यालयास/संस्थेस आवश्यक असणारे नॅक/एनबीए मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन केले नसल्यास ते त्वरित करून घेणे बंधनकारक राहील. याबाबतची पूर्तता झाली नसल्यास पुढील नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता ही स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने आपल्या महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह **अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा.** त्या अटींची पूर्तता केल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता कायम केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

**आपला विश्वासू,**

**उपकुलसचिव**
**संलग्नता/टी-2 विभाग**

प्रत :- 1. पात्रता विभाग, 2. संबधित परीक्षा विभाग, 3. परीक्षक नियुक्ती विभाग,
4. अभ्यास मंडळे विभाग 5. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग.